

**Dr. Ashish Davalbhakta**
**M.B.B.S, MS Gen. Surgery, MCh (Plastic Surgery), FRCS (Glasgow)**
**Phone : 9881311122**
**E-mail ID : ashish@aestheticsindia.org**

# सौंदर्य शस्त्रक्रियाः तारुण्यवृद्धीसाठीच्या शस्त्रक्रिया

सध्या वापरात असलेल्या सौंदर्य शस्त्रक्रियांमुळे अधिक तरुण व ताजेतवाने दिसता येणे शक्य झाले आहे. या प्रकारच्या उपचारपद्धतींना रीजन्यूव्हेशन प्रोसीजर्स (rejuvenation Procedures) असे म्हणतात. वाढत्या वयानुसार (गुरुत्वाकर्षणाने) शरीराच्या पेशींवर परिणाम होऊन त्या कमकुवत होऊन नरम बनतात. त्याचप्रमाणे भुवया खचणे, पापण्या दुमडणे,डोळयांखाली सुरकुत्या येणे, चेहे-यावर सुरकुत्या येणे, नाकाभोवती सुरकुत्या येणे, स्तन व नितंब ओघळणे यांसारखे बदल घडून येतात. हे सर्व टाळण्यासाठी खालील उपचारपद्धतींचा वापर केला जातो.

## भुवया वर उचलणे (Brow Lift)

या प्रकारची शस्त्रक्रिया खचलेल्या भुवया वर उचलण्यासाठी केली जाते.ही शस्त्रक्रिया कपाळाच्या वरच्या भागात छेद पाडून किंवा इन्डोस्कोपीद्वारे केली जाते.
या प्रकारच्या शस्त्रक्रियेमुळे तुमचा चेहरा अधिक टवटवीत दिसतो तसेच कपाळही सुरकुत्या व आठया नसल्यामुळे अधिक चांगले दिसते.

## ब्लेफॅरोप्लास्टी (Blepharoplasty)

या शस्त्रक्रियेचा वापर डोळयांभोवतीची अतिरीक्त त्वचा व घडया घालवण्यासाठी केला जातो. एका दिवसात होणारी ही शस्त्रक्रिया संपूर्ण किंवा अंशतः भूल देऊन केली जाते.बऱ्याचदा अतिरिक्त त्वचेबरोबर जादा चरबीदेखील काढली जाते किंवा redrap केली जाते.यामुळे डोळे अधिक सुंदर दिसतात.या प्रकारची शस्त्रक्रिया जर नीट केली गेली नाही तर डोळे झाकायला त्रास होऊ शकतो. त्याचप्रमाणे डोळयांच्या कडांमध्ये असमतोल निर्माण होऊ शकतो.

## रायटीडेक्टोमी (Rhytidectomy) किंवा चेहेऱ्यासाठीची शस्त्रक्रिया



ही शस्त्रक्रिया चेहेऱ्याची त्वचा घटट करण्यासाठी किंवा वर उचलण्यासाठी किंवा चेहेऱ्याचे स्नायू घटट करण्यासाठी करण्यात येते. ही शस्त्रक्रिया कानाच्या मागच्या व पुढच्या बाजूला छेद करुन करण्यात येते. त्यामुळे जखमा बऱ्या झाल्यावर दिसून येत नाहीत. या शस्त्रक्रियेनतंर चेहे-याला सूज येते व जखमाही असतात परंतु ही सूज व जखमा काही आठवडयातच बऱ्या होतात.या व्यतिरीक्त त्वचेखाली रक्त साठणे (hematoma), जखमा

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

बऱ्या व्हायला वेळ लागणे, त्वचेच्या पेशींचा ऱ्हास होणे (necrosis), चेहऱ्याच्या काही शिरा कमकुवत होणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. सौंदर्यशास्त्रतज्ज्ञ अशा प्रकारच्या समस्या टाळू शकतो व जर त्या उद्भवल्याच तर उपचारही करु शकतो.

**सर्व्हीकोप्लास्टी (Cervicoplasty or Neck Lift)**

जर मानेवर त्वचेच्या वळया (Bands) स्पष्ट दिसत असतील तर ही शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला जातो. या वळयांमध्ये स्नायूंच्या कडांचा अंतर्भाव असतो ज्याला प्लॅटीस्मा (Platysma)म्हटले जाते. हया वळया त्वचेच्या खाली असतात. मानेची त्वचा नीट करण्यासाठी या वळयांची विभागणी करणे गरजेचे असते. त्या स्नायूंना वर उचलून मागील बाजूस आधार दिला जातो. जबडयाची रचना सुधारण्यासाठी लिपोसक्शनचाही वापर नंतर करण्यात येतो.

**मॅस्टोपेक्सी (Mastopexy or Breast Lift)**

वाढत्या वयानुसार स्तन ओघळण्याची समस्या जवळजवळ सर्वसाधारण असून ही गरोदरपणानंतर व स्तनपानानंतरही उद्भवू शकते. स्तनाच्या ग्लँडयुलर (Glandular) पेशी आकुंचित पावतात परंतु स्तनावरचे त्वचेचे आवरण मात्र तसेच राहते. या आकुंचन पावलेल्या पेशींमुळे ही समस्या उद्भवते.

मॅस्टोपेक्सी या शस्त्रक्रियेमध्ये अतिरीक्त त्वचा काढून स्तनाग्र व स्तन ग्लँड अधिक वर व चांगल्या व योग्य जागी हलवले जातात. फक्त एक छेद करुनही ही शस्त्रक्रिया करता येऊ शकते. ही जखम लवकर सुकते. शस्त्रक्रियेनंतर संसर्ग (infection), रक्तस्त्राव, बधिरता येणे यासारख्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते.

**वरील सर्व उपचारप्रक्रियांमुळे तुम्ही १० ते २० वर्षांनी अधिक तरुण दिसू शकता**

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
*© Arogyadarpan.com*